**नि.फौ.ख.क्र.१४३/२०२१**
सरकार – वि.- तरुणकुमार मोहन व इतर
**निशाणी क्र. ६३**

**<u>सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्र. ३ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – सागर दिलीप चुटके
वय – ३९ वर्षे, व्यवसाय – वनपाल, कारला, लोणावळा, पुणे,
सध्या रा. - वडगांव-मावळ, पुणे.

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

सन २०२१ मध्ये माझी नेमणुक वनपाल या पदावर लोणावळा येथे होती. दि. २५/०५/२०२१ रोजी मी लोणावळा येथे नेमणुकीस होतो. त्यादिवशी आमचे आर.एफ.ओ. ताकवले साहेबांचा फोन आला की, रेल्वे पोलीसांनी रेल्वेमध्ये कासव व सरडे पकडलेले आहेत, त्यांच्या मदतीला दुरक्षेत्र लोणावळा रेल्वे स्टेशन येथे जा. मी त्या ठिकाणी गेलो. तेथे पोलीसांचा स्टाफ व अंतरकर साहेब होते. त्यांचे ताब्यात दोन आरोपी होते. त्यांच्याकडे चार बॅगा व दोन सॅक होत्या. बॅग उचकल्यानंतर प्लॅस्टीकच्या डब्यात कासव व जाळीमध्ये सरडे होते. तसेच सॅक मध्ये रंगबेरंगी मासे होते. सदरील सर्व प्राणी मोजायचे होते व त्यांची ओळख पटवायची होती. ओळख पटवण्याकरीता आम्ही पोलीसां सोबत त्यांना रेस्क्यु चॅरिटेबल ट्रस्ट, बावधन येथे घेवुन गेलो. तेथे गेलो तेव्हा ट्रस्टमध्ये नेहा पंचमिया नावाच्या मॅडम होत्या. त्यांनी सरडयाची ओळख सांगितली. सरडयांचे नाव इगवाना, कासव सल्काटा व मासे बेटा फिश असल्याचे सांगितले. त्यांनी आमचे समक्ष ते मोजले. त्यामध्ये २७९ कासव, १२०७ इगवाना व २३० बेटा फिश होत्या. मोजत असताना त्यांना ५ इगवाना व ३२ बेटा फिश मृत असल्याचे दिसुन आले. मॅडमनी पोलीसांना सांगितले की, सदरील सर्व प्राणी हे एक्झॉटीक म्हणजे बाहेरचे असुन भारतातील नाहीत. पोलीसांनी सांगितले की, पुढील कारवाई सिमा शुल्क विभागातील लोक करणार आहेत. आम्ही प्राणी जमा करुन निघुन गेलो. वरील सर्व कारवाई माझे समक्ष झाली होती. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. ते आज रोजी न्यायालयात हजर नाहीत.

**सरतपास पुर्ण.**

<u>**आरोपींतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. आर. टी. देशमुख यांच्यामार्फत सुरू-**</u>

२. मला स्वतःला प्राणी एक्झॉटीक आहेत किंवा कसे हे ओळखता येत नाही. आमचे कार्यालय खंडाळयामध्ये आहे. मी कार्यालयात सकाळी १०.०० वाजता गेलो होतो. खंडाळा पासुन लोणावळा दुरक्षेत्र साधारणतः ५ कि.मी अंतरावर आहे. ताकवले साहेबांचा फोन मला मोबाईलवर कार्यालयात गेल्यानंतर आला होता. ताकवले साहेबांचे कार्यालय वडगांव येथे आहे. मी त्यांच्या कार्यालयात गेलो नाही. त्यांचा फोन मला दुपारी ०२.०० ते ०२.३० च्या दरम्यान आला होता. फोन आल्यानंतर मी अर्धा ते पाऊण तासाने दुरक्षेत्र येथे पोहचलो. मी पोलीसां सोबत सायंकाळी ०७.०० ते ०८.०० वाजेपर्यंत होतो.

३. सदरील कारवाईच्या दरम्यान मी सहया केल्या होत्या. पोलीसांकडे मी ३० तारखेला जबाब देण्याकरीता गेलो होतो. मी पोलीसांना जबाबामध्ये **नेहा मॅडमनी पोलीसांना सांगितले की, सदरील सर्व प्राणी हे एक्झॉटीक म्हणजे बाहेरचे असुन भारतातील नाहीत** असे सांगितले असल्याचे सांगितले होते. पोलीसांनी ते माझे जबाबात का लिहले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. कार्यालयातुन बाहेर जात असताना डायरीमध्ये नोंद केली जाते. मी त्यादिवशी देखील डायरीमध्ये नोंद केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कुठलीही कारवाई झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आरोपी तेथे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.
**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.22 15:30:04 +0530

दि. २२/०७/२०२६
स्थळ - पुणे

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.